औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद
(म्हाडाचा विभागीय घटक)
गृहनिर्माण भवन, महाविर स्तंभाजवळ, सि.बि.एस. रोड, औरंगाबाद.

म्हाडा MHADA

जा.क्र.मु.अ./औ.मं./मि.व्य./ /2017 दिनांक / /2017

# देकार पत्र

प्रति,
--------------------
--------------------
--------------------

विषय :- ---------------------------------------------- या योजनेतील
सदनिका वाटपा बाबतचे देकारपत्र.
संदर्भ :- १)आपला अर्ज क्र.------ सोडत क्र.-----विगतवारी - -------- गट.
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ------- दिनांक ----------.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, -------------------------------- या योजनेतील आपला अर्ज गाळा वाटपाच्या दृष्ट्या यशस्वी ठरलेला आहे. या देकारपत्राव्दारे नमुद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता व रक्कम भरल्यानंतर तसेच आपण सादर केलेल्या कागदपत्रांच्या छाननीत आपला अर्ज पात्र ठरल्यावरच आपणास नियमानुसार एक सदनिका मंडळामार्फत ---------------- वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदनिका वाटपा बाबतचे देकारपत्र महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या (मालमत्ता व्यवस्थापन व भूखंडाची / गाळ्याची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल ) विनियम - १९८१ व त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारीत तरतुदी भूखंड / गाळा वाटपाच्या प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सुचना तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. विनियमातील वेळोवेळी होणा-या सुधारणांचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहील.

सदर सदनिकेची अंदाजित किंमत **रु.**---------------**/- (रुपये** ---------------------) इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. योजनेतील एक सदनिका आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता व देकारपत्रानुसार रक्कम भरल्यानंतर व आपला अर्ज छाननीत पात्र ठरल्यानंतरच आपणास **दि.**----------- पासून मासिक खरेदी पद्धतीवर वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मासिक भाडे खरेदी हप्ता **रु.**----------**/- (रुपये** ---------------) याप्रमाणे सदनिका वाटपापासून म्हणजेच **दि.**----------- पासून ------------ **महिने** भरावे लागतील. योजनेसाठी पाणीपुरवठ्या करीता लागणा-या मनुष्य बळासाठी तसेच

तात्पुरत्या पाणी आकारासाठी **रु.-----------/- (रुपये -------------)** तरतुद मासिक हप्त्यात करण्यात आलेली आहे. यापेक्षा जास्तीचा खर्च लागल्यास त्यानुसार मासिक हप्त्यात वाढ करावी लागेल व ते भरणा करणे आपणास बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी. उक्त योजनेतील सदनिका वाटपाचे देकारपत्र खालील अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.

सदनिका ताब्यात घेण्यापुर्वी खालील दर्शविलेल्या प्रमाणे आवश्यक कागदपत्र व संपुर्ण रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट ) **दि.-----------------** पर्यंत सादर करावा. सदर धनाकर्ष हा (डिमांड ड्राफ्ट ) **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण** किंवा **MHADA** या नावाने कुठल्याही राष्ट्रीयकृत / श्येड्युल्ड बँकेतून काढावा व तो औरंगाबाद शाखेवर देय असावा.

| अ.क्र. | विवरण | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | गाळा ताब्यात घेण्यापूर्वी भरावयाची रक्कम (आय.डी.पी.) | |
| २ | सोसायटी भाग भांडवल | |
| ३ | माहे ------ ते ------ चे मासिक भाडे हप्ता (एकुण ३१ महिने) (सेवा आकारासह) | |
| ४ | उर्वरीत आय.डी.पी. रक्कम रु.-------/- वरील विलंब आकार | |
| ५ | **एकूण रुपये** | |
| ७ | वजा अर्जासोबत व हप्त्याने भरणा केलेली रक्कम | |
| ८ | **गाळा ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणारी रक्कम** | |

वरील प्रमाणे **रु.-------/- (रुपये ----------------)** रकमेचा धनाकर्ष सादर करतांना खालील कागदपत्रे जोडण्यात यावी.

**१.** या पत्रासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर सुवाच्य अक्षरात लिहून अथवा टंकलिखीत करुन न्याय दंडाधिकारी किंवा नोटरी समोर स्वाक्षरी करुन अभिप्रमाणित केलेल प्रतिज्ञापत्र सादर करावे.

**२.** या पत्रासोबत स्विकृतीपत्र व परिशिष्ट (अपेंडीक्स) लक्षपुर्वक वाचून आपण त्यातील सर्व अटींचे पालन करणार असल्याबद्दल स्वाक्षरी करुन एक प्रत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत आपल्या माहितीसाठी ठेवावी.

**३.** गाळेवाटप झाल्यानंतर गाळेधारकास ३ महीन्याच्या आत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करावी लागेल. सहकारी संस्था स्थापन झाल्यास त्यानंतर पुढील दोन महिन्यात गृहनिर्माण संस्थांचे एक फेडरेशन स्थापन करावे लागेल व वसाहती मधील सामाईक पाणीपुरवठा, जलनिःसरण, वाह्य विद्युत पुरवठा इत्यादी सुविधांची देखभाल व दुरुस्ती ही कामे सहकारी संस्थेकडे द्यावी लागेल.

४. स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या / नगरपरीषद --------- यांच्या दराने मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर कर परस्पर भरावे लागेल. त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही.

५. आपणास ---------- येथील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या उपविभागीय कार्यालयात स्वत: अर्ज करुन विद्युत मीटर घ्यावे लागेल. विद्युत मीटर भाडे, अनामत रक्कम व इतर सर्व खर्च आपणास स्वत: करावा लागेल. विद्युत पुरवठ्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र आणि टेस्ट रिपोर्ट उपअभियंता, उपविभाग ---------, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद या कार्यालया मार्फत देण्यात येईल.

६. सदनिका ताब्यात घेतल्यानंतर सदनिकेची कसल्याही प्रकारची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी मंडळावर राहणार नाही.

७. गाळा ताब्यात दिल्यानंतर आपणास तात्पुरता ठरविण्यात आलेला मासिक हप्ता सेवा आकारासह रु.------------/- दरमहा याप्रमाणे पुढील महिन्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी भरावा लागेल. न भरल्यास प्रत्येक विलंबास उशीरा भरलेल्या थकीत हप्त्याच्या रकमेवर प्राधिकरणाच्या प्रचलित नियमानुसार विलंब आकार भरावा लागेल.

८. मा. मुद्रांक नियंत्रक व नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २७/१०/२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार म्हाडातर्फे देण्यात येणारे गाळा / भूखंड वाटपपत्र मानीव खरेदीखत समजून त्यावर विहीत दराने मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. त्यानुसार आपणास देण्यात येणा-या वाटपपत्रावर संबंधीत मुद्रांक कार्यालयात मुद्रांक शुल्क भरावे लागेल. मुद्रांक शुल्क भरल्याच्या पावतीची प्रत या कार्यालयास सादर केल्यानंतरच आपणास वाटप केलेल्या गाळ्याचा ताबा देण्यात येईल.

९. आपणास सदनिका वाटप केलेल्या पत्राच्या दिनांका पासुन १५ दिवसाच्या आत उपअभियंता, उपविभाग ---------, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांच्याकडून सदनिका ताब्यात घेणे बंधनकारक राहील. जर आपण विहीत मुदतीत गाळ्याचा ताबा घेतला नाही तर कोणतीही पुर्वसुचना न देता सदनिका मिळण्याचा आपला हक्क रद्द केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

१०. गाळ्याची पुर्ण रक्कम भरल्यावर वार्षिक अकृषिकर व सेवाआकार भरावे लागतील. तसेच गाळ्याची किंमत अंतिम झाल्यावर व त्यात वाढ झाल्यास फरकाची रक्कम भरणे आपल्यावर बंधनकारक राहील.

आपण वर दर्शविलेल्या मुदतीत वरील प्रकरणी आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्यास तसेच वर दर्शविलेल्या रकमेचा भरणा न केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपला गाळा मिळण्याचा हक्क रद्द केला जाईल व अन्य व्यक्तीस नियमानुसार गाळ्याचे वाटप करण्यात येईल. तसेच आपण भरलेल्या अनामत रकमेतुन गाळ्याच्या किमतीच्या १ % रक्कम कपात करण्यात येऊन उर्वरीत रक्कम आपणास परत करण्यात येईल व त्यानंतर आपणाशी कुठलाही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

मिळकत व्यवस्थापक
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
औरंगाबाद

C:\Users\laturdb\Desktop\Offer letter.doc